## -: प्र क र ण :- सहावे. :-

1) महसूल खात्याचे मंत्री - ना. बाळासाहेब देसाई.

2) कोयना भूकंपग्रस्तासाठी महान कार्य.

3) इतर कार्य.

---

### १) महसूल खात्याचे मंत्री :- ना. बाळासाहेब देसाई.

१९५७ पासून १९६७ पर्यंत बाळासाहेब देसाई यांनी बांधकाम, कृषी, शिक्षण व गृह खात्यांची जबाबदारी यशस्वी रित्या सांभाळली. त्या खात्यात त्यांनी नवे आदर्श निर्माण केले. १९६२ नंतर १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूका होणार होत्या. १९६७ सालच्या सार्वत्रिक निवडणूकीत ना. बाळासाहेब देसाई हे पाटण मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर बिनविरोध निवडून आले. त्यांची हि बिनविरोध निवड म्हणजे त्यांच्या कार्याची पोच पावती होय.[1]

बाळासाहेबांनी आजपर्यंत मंत्री या नात्याने केलेल्या कामगिरीमुळे त्यांनी निर्माण केलेल्या नव्या आदर्शामुळे त्यांच्या या अनुभवाचा फायदा मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी पुन्हा करुन घ्यायचा ठरविला व त्यांना आपल्या मंत्रीमंडळात सामील करुन घेतले.

१३ मार्च १९६७ रोजी बाळासाहेब देसाई यांनी उपमुख्यमंत्री व महसूल खात्याचे मंत्री म्हणून शपथ घेतली.[2] महसूल खात्याची सुत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी महसूल खात्याला नवे वळण देण्याचा त्यांनी ~~महसूलमंत्री~~ प्रयत्न केला. या खात्यात त्यांनी अमूलाग्र बदल केला. बाळासाहेब देसाई यांनी महसूल मंत्री असताना केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR ... ९४१...

महसूल खात्याचा सूक्ष्म अभ्यास व अधिका-यांच्या बैठका:-

ना. बाळासाहेब देसाई यांनी नेहमीच्या पध्दतीने महसूल खात्याचा बारकाईने अभ्यास केला. शेतक-यांचे अधिका-यांचे कोणते प्रश्न आहेत त्यांच्या अडचणी काय आहेत ? व त्यादृष्टीने कोणती उपाययोजना करता येईल याचा अभ्यास त्यांनी केला. महसूल खात्यातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्यांनी आपली कार्यपध्दती अधिका-यांना स्पष्ट करण्यासाठी बाळासाहेब देसाई यांनी विभागीय बैठका घेतल्या. व अधिका-यांना आपले धोरण स्पष्टपणे सांगीतले. व त्याचप्रमाणे विविध प्रश्नांची सोडवणूक शेतक-यांच्या हिताची झाली पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.[3]

महसूल खात्यात नवे रूप व कुळकायदयाची अंमलबजावणी :-

महसूल खाते म्हणजे महावसूल खाते, सहकारी, काळीपट्टी वसूल करणार खातं हे समीकरण बाळासाहेबांनी वैशिष्टपूर्णतेनं बदललं. महसूल खात्यात नवे रूप दिले, व धान्योत्पानांसाठी विविध योजना राबविल्या. पाणीपूरवठा, नविन खते, बि-बियाणे, शेतीची अवजारे शेतक-यांना पुरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी शेतक-यांना प्रवृत्त केले.[4]

धान्योत्पादनाची वाढ करण्यासाठी शेतमालक व कुळ यांचा झगडा मिटणे आवश्यक होते. या झगडयामुळे मालकाचे शेतीवरील लक्ष उडाले. आणि शेती करून पिकवाढी, शेतीचे उत्पादन वाढवावे याकडे कुळाचे लक्ष लागत नव्हते त्यामुळे दोघांनाही काळजी वाटत होती, की कुळकायदयाखाली चाललेला खटला जर आपल्या बाजुने झाला नाही तर जमिन सोडावी लागेल. त्यामुळे ते जमिनीची काळजी घेत नव्हते. जमिनीची अवाळ होत असल्याने धान्योत्पादनावर त्याचा अनीष्ट परिणाम होवू लागला. बाळासाहेब देसाई यांनी कुळकायदयाकडे जातीने लक्ष दिले. व अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडली.

मालक व कुळ यांच्या झगडयाचे निकाल लवकर लागत नव्हते. त्यामुळे वर्षानुवर्षे शेतीचीकामे रेंगाळत पडलेली होती. निकाल लागत नाहीत असा गैरसमज प्रचलित झाला होता. त्याचवेळी बाळासाहेबांनी जाहिर केले की, "कुळकायदयाची अंमलबजावणी १९५९ सालापासुन सुरु झाली. त्यावेळेपासून सोळा लाख प्रकरणात कुळांना मालकी हक्क देण्याबाबत चौकशी व्हावयाची होती. त्यापैकी चौदा लाख चव्वेचाळीस हजार प्रकरण निकाली निघाली व केवळ एक लाख छपन्न हजार प्रकरण निकालात निघायची होती.

शेतक-यांच्या मनात जो निकालाच्या दिरंगाईबददल गैरसमज होता, तो बाळासाहेब देसाई यांनी काढून टाकला. त्याचप्रमाणे प्रकरण निकालात काढण्याची गती वाढविण्यासाठी बाळासाहेबांनी प्रयत्न केले. जादा ट्रॅब्युलन्स त्यांनी स्थापन केली."[५]

कोल्हापूर येथे महसूल न्यायालय:-

ज्या कोल्हापूरने बाळासाहेबांना वाढविले त्यांच्यावर सुसंस्कार केले त्या कोल्हापूरला संपन्न करण्यासाठी बाळासाहेबांनी अनेक कामे केली. १९६७ ते ६९ या काळात त्यांनी महसूल मंत्री असताना महसूल खात्यातील अनेक योजना त्यांनी राबविल्या. कोल्हापूर व कोल्हापूर परिसरातील लोकांचे प्रश्न अडचणी तोडविण्यासाठी मालक व कुळे यांच्यातील संघर्ष मिटविण्यासाठी त्यांनी कोल्हापूरात महसूल न्यायालय स्थापन करणेसाठी पुढाकार घेतला. महसूल खात्याकडून लागणारी सर्व प्रकारची मदत केली व त्यांनी कोल्हापूरला महसूल न्यायालय स्थापनके केले.[६]

आधुनिक पध्दतीने शेती, शेती संशोधन व शिक्षणावर भर:-

बाळासाहेब देसाई यांनी कृषि मंत्री असताना शेती विषयक अनेक सुधारणा केलेल्या होत्या. त्याचप्रमाणे महसूल मंत्री असताना सुध्दा त्यांनी अनेक योजना राबविल्या. महसूल खाते म्हणजे धान्योत्पादन वाढविण्यासाठी महान प्रयत्न करणार खाते हे तत्व उराशी बाळगून त्यांनी विशेष प्रयत्न केले. आधुनिक पध्दतीने शेती केली पाहिजे. हे त्यांनी शेतक-यांना

सभा, मेळावे, भाषणे यातून कळकळीने सांगीतले. आधुनिक पध्दतीची अवजारे, बि-बियाणे, खते सवलतीच्या दरात पुरविली. बि-बियांणाची, खतांची निर्मीती करण्यासाठी शेती संशोधन आणि शिक्षण याबर आधिक भर दिला. त्यासाठी त्यांनी महसूल मंत्री झाल्याबर सोल्हापूरच्या कृषि महाविद्यालयात आणखी पाचशे एकर जमीन मिळवून दिली.[७]

शेतसारा माफ व शेतक-यांच्या हिताचे कायदे:-
=====================================

बाळासाहेब देसाई यांनी महसूल खात्याची सूत्र सांभाळत असताना शेतक-यांच्या हितासाठी अनेक गोष्टी केल्या. कोरडवाहू शेती पूर्णपणे पावसावर अवलंबून आहे त्या शेतीत पिक घेतले तर पिकत नाही. परंतु सर्व शेतक-यांना शेतसारा भरावा लागत होता. अशावेळी लहान शेतक-यांच्यावर अन्याय होत असे. शेतक-यांच्यावरील हा अन्याय दूर करणेसाठी महसूल मंत्री बाळासाहेब देसाई यांनी पाच एकरातील कोडवाहू शेतीचा शेतसारा माफ केला. ज्यावेळी सरकारचे स्वरुप निव्वळ कायदा, सुव्यवस्था, ठेवणे आणि महसूल जमा करणे एवढेच होते. वेलफेअर स्टेटची कल्पना पूर्ण रुजली नव्हती. त्यावेळी बाळासाहेबांच्या धोरणाचे मुल्य मोठे होते. प्रशासक म्हणून बाळा-साहेबांचा लौकिक मोठा होता.[८]

महार वतनांचा कायदा, खार जमिनीला संरक्षण देणारा कायदा, धरणाखाली ज्यांची जमीन जाते त्यांना पर्यायी जमीन देण्याचा कायदा, त्यांना पर्यायी जमीन देता आली नाही तर बाजारभावाने किमंत देण्याचा कायदा हे सारे पुरोगामी कायदे बाळासाहेबांनी आपल्या जरबेने घडवून आणले आहेत.

धान्योत्पादन वाढीसाठी भूमीहिनांना जमीन व लिफ्ट इरिगेशन योजना:-
=== ======================================================

भुमिहिनांना जमीन:-
== ===========

बाळासाहेबांनी धान्योत्पादन वाढविणेच्या दृष्टीने विशेष कामगिरी

केली होती. त्यादृष्टीने त्यांनी केलेले कार्य म्हणजे नवीन जमीन शेतक-यांना त्यांनी उपलब्ध करुन दिली. बाळासाहेब देसाई यांनी केलेले हे कार्य स्पृहणीय आहे. कमाल जमीन धारणा कायदयानुसार फक्त पुणे विभागात त्रेचाळीस हजार एकर जमीन पडीक(बरकड) होती. हि जमीन भुमिहिनांना दोन महिन्यात वाटण्याचा आदेश ९ जुलै १९६७ रोजी बाळासाहेबांनी जिल्हाधिका-यांना दिला. सबंध महाराष्ट्रात अशाप्रकारे दोन लाख सदतीस हजार एकर जमीन पडीक(बरकड)म्हणून होती. ती लागवडीखाली आणण्यात आली. धान्योत्पादनाला गती यावी व पडीक(बरकड) जमीनी लागवडीखाली याव्यात म्हणुन एकरी शंभर रुपये मदतीदाखल शेतक-यांना दिले. सरकारच्या सक्रिय साहयामुळे धान्योत्पादन वाढले.[९]

जमीन सुधारणा कायदयान्वये पडीक जमीन वाटप योजनेखाली पुणे विभागात तीन लाख सदुसष्ट हजार एकर जमीनही तीन लाख चौदा हजार भुमिहिनांना व भुमिहिनांच्या अकराशे एक सोसायटयांना देण्यात आली. भुमिहिनांना सरकारने दिलेल्या जमिनीत जर त्यांनी अन्नधान्याचं उत्पादन केल नाहीतर त्या जमीनी त्यांच्याकडून परत घेण्याची कायदयाची तरतूद केली आहे. त्यामुळे धान्योत्पादन हे केलेच पाहिजे. ज्या भुमिहिनांना या जमिनी दे देण्यात आल्या त्यापैकी बहुसंख्य नवबौध्द आहेत.

भुमिहिनामध्ये जंगल विभागातील जमिनीच वाटप करण्याच्या कार्याला बाळासाहेबांनी चालना दिली. तीस हजार एकर जमीन सदतीसशे भुमिहिनांमध्ये वाटण्यात आली. शिवाय एकरी शंभर रुपयाप्रमाणे बत्तीस लाख रुपयांची मदत त्या शेतक-यांना करण्यात आली.

## लिफ्ट इरिगेशन योजना :-

शेतक-यांच्या कल्याणाची काळजी घेण्यात बाळासाहेब देसाई नेहमी अग्रेसर होते. धान्योत्पादन वाढीसाठी व शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने शेतीस

पाणीपुरवठा करण्यासाठी त्यांनी लिफ्ट इरिगेशन योजनाचे नियोजन केले. लहान शेतक-यांच्यासाठी लिफ्ट इरिगेशन योजनांना मंजुरी घेवून त्या कार्यान्वीत केल्या पाटणसाठी त्यांनी २७ लिफ्ट इरिगेशन योजना मंजूर केल्या होत्या. लिफ्ट इरिगेशन योजनेची सामान्य शेतक-याला कोणत्याच प्रकारची माहिती नव्हती. म्हावशी, अकुळ, मल्हारपेठ, मंद्रुळ हवलेली इत्यादी ठिकाणाच्या लिफ्ट इरिगेशन योजना बाळासाहेबांच्यामुळे पूर्ण झाल्या आहेत. या लिफ्ट इरिगेशन योजनेसाठी शेतक-यांच्यामुळे कोणत्याच प्रकारची कपात करुन घेतली नव्हती.

कोल्हापूर, पाटण व कोकण विभागात त्यांनी जास्ती-जास्त लिफ्ट इरिगेशन योजना मंजूर करून कार्यवाहीत आणल्या.

## नवा जमीन महसूल कायदा व ६00 वाडयाचे स्वतंत्र महसूली गावांत रूपांतर

बाळासाहेब देसाई महसूल मंत्री होते त्यावेळी सत्तेपेक्षा सेवेकडे दृष्टी असलेल्या या लोकनेत्याने महसूल खात्यातही गरीब शेतक-यांच्या दृष्टीने अनेक हितकारक तरतुदी केल्या आहेत. त्यामध्ये नवा जमीन महसूल कायदा व ६00 वाडयाचे स्वतंत्र महसूली गावांत रूपांतर हे त्याचे निर्णय क्रांतीकारक आहेत.[10]

बदलत्या काळानुसार बदलत राहिले पाहिजे या तत्वानुसार वाडी वस्ती मोठी झाली की तिला गावाचा दर्जा दिला पाहिजे असा दृष्टीकोन बाळासाहेब देसाई यांचा होता. गांव होण्यास पात्र असलेल्या अशा सहाशे वाडया महाराष्ट्रात होत्या. त्या स्वतंत्र गांव म्हणुन आस्तीत्वात नव्हत्या. मुळातच त्यांच्या विकासाची कुचंबणा होत होती. त्यांना स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन करता येत नव्हत्या गांवचा विकास साधण्यासाठी नवा महसूल कायदा केला त्यात बाळासाहेबांचा मोठा वाटा आहे. कायदा झाल्यानंतर सर्व वाडयाचे गावांत रूपांतर

करण्यात आले हा बदल वाडयाचे रंगरूप बदलण्यात कारणीभूत झाला. त्या नव्या गावात शाळा, पाणी पुरवठयाच्या सोयी झाल्या. ग्रामविकास धडाक्याने होवू लागला.[११]

नव्या महसूल कायदयाने शेतक-यांच्यासाठी सुविधा:-

महसूलांच्या नव्या कायदयानुसार गुरे-चराई, स्मशान, रस्ते, बागा, गांवठाणं, जळाऊ लाकुड इत्यादी सार्वजनिक व लोकजीवनाशी निगडीत असलेल्या गोष्टीसाठी सरकारी जमीन राखून ठेवण्याची खास सोयही करण्यात आली. शिवाय संरक्षीत जंगलाखेरीज सरकारी मालकीच्या ज्या इतर जमीनी आहेत त्या जमिनीतील जळावू लाकुड शेतक-यांना मोफत मिळण्याची तरतूदही या कायदयात करण्यात आली होती. शेतीची अवजारे बनविण्यासाठी ज्या प्रकारच लाकूड लागत असेल त्या प्रकारचे लाकूड सरकारी जमिनीतून मोफत मिळण्याची व्यवस्था या निर्बंधात करण्यात आली होती. घरगुती कामासाठी , शेतीसाठी किंबा व्यवसायासाठी जर दगड माती लागत असेल तर ती मोफत किंवा माफक दरानं गावक-यास नेऊ देण्याची सोय या कायदयात केलेली होती. तसेच ज्या पाण्याच्या बाबतीत पाटबंधारे विषयक तरतूद लागू नसेल असे सरकारी मालकीच पाणी शेतक-याला दरसाल फक्त एक रूपया या नाममात्र दराने देण्याची तरतूद केली होती.[१२]

फाळापटटी न भरल्याबद्दल शेतक-यांची जप्त झालेली जमीन लिलावात न विकता ती तीन वर्षापर्यंत सरकारी व्यवस्थेखाली ठेवण्याची तरतूद या कायदयात करण्यात आली. या अवधीत जमीन मालकाने सर्व थकबाकी भरली आणि दंडादाखल जमीन परत मिळविता येत होती. या नव्या कायदयाची जमीनधारकांना मालकी जमीनीतील सर्व प्रकारच्या झाडांवरील सर्व हक्क बहाल करण्यात आले आहेत. हि अत्यंत महत्वाची घटना घडली आहे.

पूर्वी शेतीसाठी घेतलेल्या जमिनीचा उपयोग बिगर शेतीच्या कामासाठी करावयाचा झाल्यास जिल्हाधिका-याची परवानगी लागे. या कायदयाने वेगळी रचना केली आहे. तीन महिन्याच्या आत जर जिल्हाधि-

का-याकडून परवानगी मिळाली नाही तर बिगर शेतीच्या कामासाठी परवानगी आहे असे समजण्यात येवू लागले. शेती बागायत करण्याच्या शेतक-यांच्या प्रयत्नात पूर्वीच्या कायदयात काही अडचणी निर्माण झाल्या होत्या. स्वतंत्र किंवा सरकारच पाणी असतानासुध्दा पाण्यापसून काहिश्या दूर अंतरावर असलेल्या आपल्या शेतात त्यांना दूर-दूरच्या जमिनीतून पाणी नेता येत नसे, साहजिकच त्यांची बागायती शेतीची कल्पना मूर्तरूप होत नसे, धान्योत्पादनावर त्याचा परिणाम होत असे. नव्या कायदयातील तरतूदीमूळे दुस-याच्या जमिनीतून पाट बं बांधून किंवा नळ टाकून पाणी नेण्याची मुभा शेतक-यास देण्यात आली आहे नव्या जमीन महसूल कायदयामुळे शेतक-याचे कल्याण झाले अनेक सुविधा उपलब्ध झाल्या.

गारपीठ व पाऊस यामुळे नुकसान झालेल्या आपदग्रस्तांना सहकार्य

( अकाली वृष्टी, गारपीठ, कडाक्याची-ही थंडी ) अकाली वृष्टी, गारपीठ व कडाक्याची थंडी इ. प्रसंगी ज्याचे नुकसान झाले त्या भागातील शेतक-यांना महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांनी सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी मोठी धडपड केली. शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात त्यांनी सरकारकडे येण्याची वसुलीची तहकुबी केली. शेतक-यांच्या शेतातील पीक नष्ट झाले असेल तर शेतक-यांच्या झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात त्यांनी सरकारकडे येण्याची वसुलीची तहकुबी केली. शेतक-यांच्या शेतातील पीक नष्ट झाले असेल तर शेतक-यांच्या नुकसानीचा अंदाज घेवून ज्या गावातील शेतजमिनीच्या पटटयामध्ये पिकांची आणेवारी ६ आण्यापेक्षा कमी असेल तेथे धान्य वसूली स्थगित करावी. तसेच ज्या शेतक-यांच्याबाबती धान्य वसूलीचे प्रमाण, पिकांची हानी लक्षात घेता ज्यादा आढळून येईल त्यांच्याकडून कमी प्रमाणात धान्य वसूली करावी असे त्यांनी आदेश दिले.[१३]

जमीनधारकांना खाते पुस्तिकाचे वाटप :-

महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांनी जमीन धारकांना खातेपुस्तिकाचे

बाटप करण्याचे अत्यंत महत्वाचे काम केले आहे. शेतक-यांना आपल्या शेतीची महत्वाची माहिती, कागदपत्राच्या साहय्याने मिळाली पाहिजे व कायम स्वरूपी ती माहिती शेतक-यांच्याकडे असली पाहिजे. यासाठी खाते पुस्तिकाचे बाटप करण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

श्री. बा. आ. नायक, श्री प्र्य. सी. कारखानीस(कोल्हापूर) श्री. ज. ग. कदम(आर्वी)श्री. रा. का. म्हाळंगी यांनी खातेपुस्तिकाबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देतात बाळासाहेब देसाई म्हणतात, खातेपुस्तिका योजना नेहमी चालू आहे. खातेदाराचे जसजसे अर्ज येत आहेत. तसा-तसा पुस्तिका दिल्या जात आहेत. अर्ज आल्यापासुन तीन महिन्याच्या आत पुस्तिका तयार करून घ्यावयाची असते त्याचप्रमाणे ती तयार करून दिली जात आहे. खातेपुस्तिकांची छपाई व कागद यावर आतापर्यंत अंदाजे वीस लक्ष रुपये खर्च झालेला आहे अशी माहिती त्यांनी विधानसभेत ११ जुलै १९६८ रोजी दिली.[१४]

<u>शेतक-यांची कामे अधिका-यांच्याकडुन जलद गतीने करून घेतली.</u>

महसूलमंत्री बाळासाहेब देसाई हे शेतक-यांच्या बरोबर नेहमी मनमोकळेपणाने चर्चा करीत असत. त्यांच्या अडचणी समजावुन घेत. शेताबर काम करण्यात शेतकरी उत्सुक असला तरी शासकीय यंत्रणेतील शैथिल्य अथवा शासकीय" लालफित" शेतक-यांच्या उत्साहाच्या आणि प्रगतीच्या आड येत असल्याचे पदोपदी त्यांच्या नजरेत येवू लागले. बाळासाहेबांनी लगेच त्याच्याबर उपाय शोधून काढला. प्रत्येक शेतक-याला जवळ बोलाविण्यात येई त्यांच्या अडचणीचे निवेदन ऐकुन घेतले जाई. लगेच ते संबंधीत अधिक-याला बोलावुन त्यांच्याबर प्रश्नाची बरसात करीत शेतक-यांच्या अडचणी अगदी सामान्य स्वरूपाच्या असुनही त्या दुर का केल्या नाहीत असा जाब ते विचारत व खडसावुन सांगत" आज सायंकाळचे आत या शेतक-याच्या तक्रारी दूर झाल्या पाहिजेत रात्री सता मला रिपोर्ट दया."[१५]

बाळासाहेबांच्या या कामकाज पध्दतीमुळे शेतक-यांची जी कामे पंधरा-वीस मिनिटात होवू शकतात, पण ज्यांना पंधरा-वीस दिवसांचा अवधी लागतो अशी कामे त्या दिवशी सायंकाळ पर्यंत पूर्ण झालेली प्रत्यक्षात दिसून आली.[१६]

अचानक भेटीचा कार्यक्रम :-

बाळासाहेब देसाई महसूल खात्याच्या कामांना, कार्यालयांना योजनांना अचानकपणे प्रत्यक्ष भेटी दत होत सावनेर येथील तहसीलदार कचेरीला बाळासोबांनी सकाळी साडेदहाच्या सुमारास अचानक भेट दिली. त्या ठिकाणी तहसीलदाराचा पत्ता नव्हता. सर्व अधिकारी गैरहजर होते. त्यांनी त्याठिकाणी त्यांची यादी तयार केली. कामकाजाची चौकशी केली. अधिका-यांची कसून तपासणी केली, व कडक शब्दात त्यांना सुनावले, या त्यांच्या कामकाजाच्या पध्दतीमुळे सर्व सरकारी कचे-या सावध झाल्या. व संपूर्ण महसूल खाते केळीच सावध झाले होते.[१७]

२)कोयना भूकंपग्रस्तासाठी महान कार्य:-

दिनांक ११ डिसेंबर, १९६७ रोजी महाराष्ट्राच्या पश्चिम भागामध्ये भूकंपाचा मोठा धक्का बसला व या धक्यामुळे सातारा रत्नागिरी, सांगली व कोल्हापूर या जिल्हयातील अनेक गावांत मोठया प्रमाणात जीवीत हानी झाली व मालमत्तेचेही मोठया प्रमाणात नुकसान झाले.[१८]

कोयना भूकंपाची घटना हि एक अतिभयानक आपत्ती होती. निसर्गाने केलेली मानवाची अत्यंत क्रूर आणि हृदयविदारक अशी थट्टा होती. भूकंपाने तेथील लोकांचे जीवन पूर्णपणे उधवस्त झाले बबॉम्बचा वर्षाव केल्याप्रमाणे, भूकंपामूळे हजारो घरे जमीनदोस्त झालीहोती. वित्त व जीवीतांची भयंकर हानी झाली होती. सातारा, कराड, कोल्हापूर, सांगली वगैरे शहरातील



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

हॉस्पीटल मध्ये मरणोन्मुख स्थितीत पडलेल्या जखमी लोकांचे भेसूर दृश्य हृदयाला पाझर फोडीत होते. जनावरे भयभीत झाली होती. कुटूंबे उध्दवस्त झाली होती. भूकंपामुळे पडलेल्या अजस्त्र भेगांनी टेकडया सुध्दा एकमेकापासुन दुरावल्या होत्या. भुकंपग्रस्तांची भयानक अवस्था होती.[१९]

कोयनेच्या अपादग्रस्ताकडे सर्वात अगोदर कोण धावले असतील तर ते लोकनेते बाळासाहेब देसाई होय.

भूकंप झाला त्या रात्री बाळासाहेब देसाई पूर्णे याठिकाणी होते. भुकंपामुळे पूल ढासळे होते. एका व्यक्तीने डांबावर चढून त्यांना फोन केला व त्यांना बोलावले क्षणाचाही विलंब न लावता बाळासाहेबांनी भुकंपग्रस्तांच्याकडे धाव घेतली. संकटग्रस्त जनतेच्या रक्षणाच्या आपल्या अंगीकृत वृताला हे एक आव्हान होय, असं त्यांनी मानलं. आपल्या कर्तृत्वाच्या कसोटीची हि वेळ आहे असे त्यांना वाटले. आणि संकटाला तोंड देण्यासाठी भुकंपाच्या ठिकाणी जावून त्यांनी तळ ठोकला. कृतनिश्चयाने त्यांनी साडेतीन लाख लोकांच्या जीवनाचा जो विध्वंस झाला आहे तो दूर करण्यासाठी व त्याच्या आयुष्याची घडी पुन्हा बसविल्याखेरीज येथून हलायच नाही या गंबीर प्रतिज्ञेने ते कामाला लागले. त्यांनी सर्व भागातील भुकंपग्रस्तांची स्वत: पाहणी केली व त्यांना भाकरी, कपडे व जेवणाचे डबे स्वत: फिरुन वाटले. प्रसंगी स्वत:च्या खिशातील पैसे लोकांना दिले. हेळवाकचा पूल पडला त्यावेळेस ते स्वत: हजर होते. त्यांनी भुकंपग्रस्तांच्या यातना जवळून पाहिल्या आणि वेगाने कामात लागले.[२०]

~~भूकं~~ भुकंप ~~झाला~~ झाल्यानंतर बाळासाहेब देसाई तावडतोब आले व त्याठिकाणी दोन महिने राहिले व लोकांची मनशांती होईपर्यंत ते तेथून गेले नाहीत लोकांच्या मनातील भिती त्यांनी हळूहळू घालविली व त्यांना सब प्रकारचे सहाय्य केले व शासकीय मदतीचा ओघ कोयनेकडे वाहू लागला. दोन महिने त्यांनी आहेरात्र काम केले. गरीबांची घरे पावसाळ्यापूर्वी तयार झाली पाहिजेत व प्रत्येक व्यक्तीला मदत मिळाली पाहिजे यासाठी त्यांनी आहोरात्र कष्ट घेतले.[२१]

भुकंपग्रस्त व अनर्थाचा अंदाज घेत घेत बाळासाहेब देसाई कोयना-

SAKR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

नगरच्या वेशीवर पोहचले. तेथे शेकडो लोक रक्तबंबाळ व भांबावलेले चेहरे दिसत होते. जागोजागी दगड मातीचे ढिगच्या ढिग दिसत होते उध्वस्त संसाराच्या या ढिगा-यातुन ते चालु लागले. ढिगा-याखाली गाडल्या गेलेल्यांना सोडविणेचे पहिले काम त्यांनी सुरु केले. ढिगारे उपसण्याचे काम करण्यासाठी भोवतालच्या चार-पाच जिल्हयातून स्पेशल पोलिस दलाची पथके त्यांनी तातडीने हुकूम सोडून बोलावून घेतली, या सर्व पथकांनी प्रसंगी प्राणाची पर्वा न करता आपली कामगिरी केली. ढिगा--याखालून शेकडो प्रेते बाहेर काढली, जखमी झालेल्या हजारो माणसांची सोय लगतच्या प्रदेशातील ठिकाठिकाणच्या हॉस्पीटलमध्ये करण्यात आली. एस्.टी. गाडया, ट्रक्स, आदीकरुन मिळेल त्या साधनांनी प्रथमता जखमींना क-हाड, सांगली, सातारा व पुणे या ठिकाणच्या रुग्णालयात पोहचविण्याची व्यवस्था बाळासाहेब देसाई यांनी केली. त्याचप्रमाणे प्रेतांची विल्हेवाट लावण्याची योजना आखून ती कार्यान्वीत केली. "भाकरी पाठवा" भाकरी पाठवा" असे तातडीचे संदेश त्यांनी भोवतालच्या पाचही जिल्हयात पाठवले, चटणी भाकरी मुबलक आली, भुकंपात सापडलेल्या लाखो लोकांनी त्या चटणी भाकरीवर भुक भागविली. बाळासाहेब गावोगावी भुकंपग्रस्तांना भेटी देवून लागले. त्यांना मदत देण्यासाठी सतत परिश्रम करु लागले.[२२]

भुकंप ग्रस्तांना त्वरीत मदत मिळाली पाहिजे यासाठी बाळासाहेबांची मोठी धडपड चालु होती. यशवंतराव चव्हाण व मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे दोघेही कोयनानगरला आले. त्यांच्याशी बाळासाहेबांनी विचारविनिमय केला. मंत्रीमंडळातील तीन-चार मंत्र्यानी तसेच इतर प्रतिष्ठितांनी त्यावेळी कोयनानगरला भेट दिली. त्या सर्वांच्या बरोबर बाळासाहेबांनी चर्चा केली.[२३]

पक्षश्रेष्ठींना, मुख्यमंत्र्यांना, केंद्रिय मंत्र्याना व अधिका-यांना कोयनेच्या भुकंपाच्या भयानकतेचे वर्णन करताना ते सांगत, "जमिनीतुन गडगडाट होत होता. मोठमोठे आवाज येत होते. घरे ढासळत होती. रक्तबंबाळ माणसे, पहावी तिकडे सैरावैरा धावत होती. प्रेताचे ढिग लागत होतं. जखमीचे विव्हळणे अंत:करणाला पाझर फोडीत होत. उधवस्त घराघरातून हिंडताना अधून-मधून हादरे बसत होते. हादरा

बसला कि माणसे भित होती व पळत सुटत होती. लहान-लहान मुले भितीने किंचाळत होती. सर्वांचा धीर खचला होता. अशाप्रकारे भुकंपाची वास्तवता व भयानकता संबंधीतांच्या पुढे बाळासाहेबांनी मांडली व मदतीचा ओघ जास्ती जास्त कोयनेकडे वळविण्याचा प्रयत्न केला.[२४]

एका गांवाहून दुस-या गांवी, दुस-या गांवाहून तिस-या गांवी असे बाळासाहेब झपाटयाने हिंडत होते. लोकांच्याकडून कहाण्या ऐकत होते. त्यांच्याबरोबर ते अश्रू ढाळीत होते. लोकांना धीर देत होते. व जास्तीत जास्त मदत त्यांना देण्यासाठी धडपडत होते. परिसरातील सर्व गावांना भेटी देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. बिजलीच्या वेगाने बाळासाहेब कामात लागले महाराष्ट्रातील अवघ्या जनतेला त्यांनी मदतीचे अवाहन केले. कुणी घर बांधून द्यावी, कोणी खाण्या-पिण्याची सोय करावी कपडयालत्त्यांची सोय करावी. काही लोकांनी येवून त्यांच्यात राहून त्यांना धीर देवून त्यांच्यातील घबराट नाहीशी करावी. अशा त-हेचे हे अवाहन होते, बाळासाहेबांच्या अवाहनामुळे संबध महाराष्ट्रातून मदतीचा ओघ सुरु झाला. तिच वाटप योग्य त-हेने व्हावं म्हणून वाटप केंद्रे निर्माण केली. संकटग्रस्त भागातील बातमी कळावी व निरनिराळ्या केंद्राना तात्काळ आदेश देता यावेत म्हणून वाटप केंद्र धरुन शंभर चौरस मैलाच्या टापूत वायरलेसच जाळं त्यांनी पसरविला, हे जाळ चिपळूण, कराड कोयनानगर, ढेबेवाडी, ताळे, जावळी, सातारा, महाबळेश्वर या भागात पसरले होते. मदतीच्या अवाहनाला महाराष्ट्रातील जनतेने गरूड गतीने प्रतिसाद दिला. हजार वाटांनी मदत येवूलागली. अन्न पदार्थाचे ट्रकसच्या ट्रक येत होते. कपडे, धोतर, लुगडी, अंथरुण, ब्लँकेटस्. केरडेखाऊचे सुडे, साडया चादरी, संसारपयोगी भांडी-कुंडी यांचा प्रचंड ओघ येवून धडकत होता. वासे, बांबू , घरासाठी पत्रे इत्यादी घरबांधणीच्या सामानांच्या गाडयांची रीघ लागली होती. जखमींची सेवाशुश्रूषा करण्यासाठी औषधोपचार करणारी वैद्येकीय पथक दाखल होत होती.[२५]

कोयना भागतील भुकंपग्रस्तासाठी सुरु असलेल्या सर्व मदत केंद्रावर

धान्य, पत्रा, बांबू यांचा कोठा पोहचलेला असून त्यामुळे खो-यात समाधान दिसत आहे. असे दिनांक २१ डिसेंबर, १९६७ रोजी महसूल मंत्री बाळासाहेब देसाई यांनी पत्रकारांशी बोलतना सांगितले ते पुढे म्हणाले की, पूर्वी माणसी ५ किलो धान्य दिले जात होते ते आता १० किलो देण्यास शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. शासनाकडून भुकंपग्रस्तासाठी ५ हजार कंदिल, १४ हजार ब्लँकेटस मंजूर झालेली असून ५० हजार पत्र्यांची पाने मिलिटरी इंजिनियरिंग कडून मिळणार आहेत.[२६]

महसूल मंत्री बाळासाहेब देसाई यांनी पाटण परिसरात भुकंप-मुळे उधवस्त झालेली ७०,००० घरे पुन्हा उभी केली. अशाप्रकारे जास्ती-जास्त मदत सरकारकडून व जनतेकडून मिळविण्यासाठी बाळासाहेबांनी सतत धडपड केली.[२७]

मुख्यमंत्री व वसंतराव नाईक यांनी भुकंपग्रस्तांची व भुकंपग्रस्त व कामाची पाहणी केली याबाबत श्री. कृ.ना. धुळप(कल्याण) यांच्या, प्रश्नाला उत्तर देताना बाळासाहेब देसाई यांनी भुकंपग्रस्ताच्यासाठी केलेल्या कामाचा आढावा मुख्यमंत्री वसंतराव नाइक यांनी विधान सभेत दिला तो पुढीलप्रमाण.

" महसूल मंत्र्यानी भुकंपग्रस्त लोकांचे मनोधैर्य टिकवण्याबदल सांगितले ज्या लोकांची घरे पुन्हा बांधणे जरुरीचे होते त्यांनी बाहेरुन येणा-या सुतार गवंडी वगैरे लोकांची वाट न पाहता आपण स्वत: घरे बांधण्यास सुरुवात करण्याची किती निकड होती हे पटवून दिले, पडलेल्या शाळांची पाहणी केली. लोखंडी घराचे बांधकामाबाबतची प्रगती पाहिल्यानंतर त्यांनी संबधीत कंत्राटदारांना याबबत योग्यती दक्षता घेवून काम मुदतीत करणेबाबत सुचना दिल्या. ज्या इतर संस्था काही गांवात घरे बांधणार होत्या त्यांनाही कामासंबंधी सुचना देवून काम सत्वर करण्याबद्दल विनंती केली. महसूल मंत्री यांच्या दौ-याच्यावेळी इमरतीस लागणारे

सामान भरपूर प्रमाणात येत नसल्याबदल कल्पना दिली. त्यांनी याबाबतीत योग्य तो उपाययोजना केल्याने सामान येण्यास सुरुवात झाली. तसेच महसूल मंत्र्यानी कोयनाधरणास भेट देवून धरणाच्या भूकंपणाबद्दल खात्री करुन घेतली. त्यांनी लोकांना धरणं फुटल्याबदलच्या अफवावर विश्वास न ठेवण्याबदल दिलासा दिला. महसूल मंत्री यांच्या दौ-यामुळे कोयना भुकंप ग्रस्त निधी जमा होण्यास जोराची चालना मिळून निधी अदाजे रक्कम रुपये एक लाख जमा झाला.[२८]

भुकंपग्रस्तांना त्वरीत मदत करण्यासाठी सरकारी कामात कधीही आढळून न येणारी अशी फार मोठी कार्यक्षम यंत्रणा महसूल मंत्री ना. बाळासाहेब देसाई यांनी निर्माण केली. मदतीचे तातडीने वाटप करणे हे अत्यंत गरजेचे तसेच जोखमीचे काम होते. बाळासाहेबासारख्या खंबीर कुशल, विना विलंब निर्णय देणा-या, अडचणींनी हताश न होणा-या, सरकारी नोकर चाकर यांच्यामध्ये स्फूर्ती निर्माण करणा-या, कामाचा प्रचंड उरक असलेल्या, जिध्दीच्या कर्णधाराने मानवलेला ग्रसणारे हे भयानक संकटनिवारणयाचा महान प्रयत्न केला. स्वत:च्या प्रकृतीची चिंता न करता रखरखत्या उन्हातून फिरुन त्यांनी मृतप्राय भुमीत नवचैतन्य निर्माण केले.

१९६७ ते १९६९ या कालखंडात ना. बाळासाहेब देसाई यांनी महसूल खात्यात अमूलाग्र बदल घडवुन आणला. अनेक योजना राबविल्या, शेतक-यांच्या हितासाठी त्यांनी आपल्या महसूल खात्याच्या कारकिर्दीत अनेक कायदे केले धान्योत्पादन वाढीसाठी सतत प्रयत्न केले. अशाप्रकारे बाळासाहेब देसाई यांनी महसूल खात्याला आदर्श वळण लावून दिले. त्यांची महसूल मंत्री पदाची कारकिर्द म्हणजे एखाद्या उत्तम प्रशासकाला शोभेल अशीच होती.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## -:- संदर्भ -:-


१) महाराष्ट्राचे भाग्यविधाते ना. बाळासाहेब देसाई:- सौ. सविता देवी मिसाळ पान नं. ३५.

२) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के. जी. सुर्यवंशी पान नं. ३४२.

३) मुलाखत:- बाबुराव कोतवाल कराड- स्वातंत्र्य सैनिक व आमदार; वय=५८ दिनांक = ५-१-१९९०.

४) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी पान नं. ३४३.

५) मुलाखत:-भागवतराव देसाई- मरळी-माजी अध्यक्ष जिल्हा परिषद सातारा; वय=६८ दिनांक=१९-१०-१९९०.

६) दैनिक पुढारी कोल्हापूर=रविवार दि. २४ एप्रिल १९८३.

७) मानवतेचा थोर नंदादिप-नामदार बाळासाहेब देसाई- प्राचार्य अ.अ. मेमन पान नं. ७.

८) साप्ताहिक धुमकेतू-नामदार बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक पान नं. १३.

९) बहुजन हिताय बहुजन सुखाय-के.जी. सुर्यवंशी , पान नं. ३४५.

१०) साप्ताहिक धुमकेतू=नामदार बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक पान नं. २७.

११) मुलाखत:- राजाभाऊ जोशी कोल्हापूर, संपादक साप्ताहिक धुमकेतू कोल्हापूर. वय=६७ दिनांक २७-७-१९८९.

१२) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी पान नं. ३४६, ३४७.

१३) डिबेट:- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॅल्युम=टवेन्टी थर्ड, (२३) पार्ट=सेकंड, फेब्रुवारी-एप्रिल १९६८ पेज नं. ९८९.

१४) डिबेट:- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॅल्युम=ट्वेन्टी फोर, पार्ट=फर्स्ट, जुलै १९६८ पेज नं. २५५.

१५) दौलत:- ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक पान नं. ३३.

१६) मुलाखत:- आर.बी. जाधव सातारा संपादक दैनिक ग्रामोद्धार सातारा; वय=८२, दिनांक १२-८-१९९०.

१७) दौलत:- ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक, पान नं. ३१, ३२.

१८) डिबेट:- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि, व्हॅल्युम=२३, पार्ट=सेकंड, फेब्रुवारी-एप्रिल १९६८ पेज नं. १३८.

१९) मानवतेचा थोर नंदादिप:-ना. बाळासाहेब देसाई-प्राचार्य अ.अ.मेनन पान नं. ८.

२०) मुलाखत:- बाबुसाहेब कापसे कोल्हापूर, संपादक दैनिक समाज कोल्हापूर.

२१) मुलाखत:- गणपती भाऊ देसाई, मल्हारपेठ,माजी चेअरमन खरेदी विक्री संघ पाटण. वय=६३ दिनांक=१९=१०=९०.

२२) दौलत:- ना. बाळासाहेब देसाई एकसष्टी सत्कार समिती अंक, पान नं. २९.

२३) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी, पान नं. ३५२.

२४) मुलाखत:- बाबूराव बाळासाहेब पाटील, किवळ, ता. कराड स्वातंत्र्य सैनिक. वय=५९ दिनांक ५-१-१९९०.

२५) बहुजन हिताय बहुजन सुखाय:- के.जी. सुर्यवंशी पान नं. ३५६.

२६) साप्ताहिक ग्रामोद्धार सातारा, सोमवार दिनांक४-१-६८.

२७) साप्ताहिक धुमकेतू:- ना. बाळासाहेब देसाई स्मृती विशेषांक पान नं. १३.

२८) डिबेट:- महाराष्ट्र लेजिस्लेटिव्ह असेंब्लि व्हॅल्युम= ट्वेनटी फोर पार्ट= फर्स्ट, जुलै १९६८ पान नं. ४३३.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR